# प्रेस नोट

दिनांक ०८/०६/२०१९

मा. पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांनी वाशिम पोलीस दलाचा पदभार स्विकारल्यापासुन अनेक धडाकेबाज कार्यवाही करत अनेक गुन्हेगांराच्या मुसक्या आवळल्या आहेत. जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणांना भेट देवुन आढावा घेतला असता त्यांना प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये बेवारस स्थितीमध्ये वर्षानुवर्षापासुन पडलेल्या दिसुन आले आहे. सदर बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांनी मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार चव्हाण सो यांचे नेत्तृत्वात विशेष मोहिम हाती घेतली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत बेवारस वाहनाचा आढावा घेतला असता पोस्टे वाशिम शहर येथे १०५ वाहने, पोस्टे मालेगाव येथे ४२ वाहने, पोस्टे रिसोड येथे ८६ वाहने, पोस्टे शिरपुर येथे १६ वाहने, पोस्टे कारंजा शहर येथे ६५ वाहने, कारंजा ग्रामिण येथे ०४ वाहने, पोस्टे जवुळका येथे १७ वाहने, पोस्टे आसेगाव येथे ०२ वाहने, पोस्टे अनसिंग येथे ०१ वाहन बेवारस स्थिती मध्ये आढळुन आलेले आहेत. सदर वाहनाची संपुर्ण माहिती वाशिम जिल्हा पोलीस दलाचे वेबसाईडवर प्रकाशित करण्यात आली आहे. ज्यांचे कोणाचे मालकीचे हे वाहने असतील त्यांनी संबंधित पोलीस ठाणे येथे वाहनाचे मालकीच हक्काबाबतचे कागदपत्रासह हजर होवुन आपली मालकी सिद्ध करावी. अन्यथा सदरचे सर्व वाहने महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१चे कलम ८५ व ८७ प्रमाणे सदर वाहनाचा जाहिर लिलाव करण्यात येईल याची सर्वांनी नोद घ्यावी.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम